**“मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना” करीता स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: लवेसू २०२५/प्र.क्र.०२ (ई-१४८९४९०)/पाणंद रस्ते**
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
तारीख: २३ फेब्रुवारी, २०२६

**वाचा :-**

१. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १४.१२.२०२५

**प्रस्तावना -**

ग्रामीण भागात शेत/पाणंद रस्त्यांची असलेली आवश्यकता, त्यांचे महत्व व सद्यःस्थितीत शेत/पाणंद रस्त्याच्या कामांकरिता मनरेगा अंतर्गत येणा-या अडचणी विचारात घेता पूर्णपणे यंत्रसामुग्रीचा वापर करुन शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी महसूल विभागामार्फत "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" ही स्वतंत्र योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने दि.०७.१२.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. याअनुषंगाने दिनांक १४.१२.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

“मुख्यमंत्री बळीराजा शेत /पाणंद रस्ते योजना” या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडून अर्थसंकल्पीय तरतूदीद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या योजनेकरीता निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्याची व मुख्यमंत्री बळीराजा शेत /पाणंद रस्ते योजनेंतर्गत कॉर्पोरेट कंपन्यांकडून सामाजिक दायित्व निधी (C.S.R. - Corporate Social Responsibility) अंतर्गत उपलब्ध होणारा निधी जमा करण्यासाठी विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव उप विभागीय अधिकारी यांच्या नावे बँक खाते उघडण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णयः-**

“मुख्यमंत्री बळीराजा शेत /पाणंद रस्ते योजना” या योजनेसाठी निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी पुढीलप्रमाणे लेखाशीर्ष निर्माण करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| **लेखाशीर्ष (इंग्रजी)** | **लेखाशीर्ष (मराठी)** |
|---|---|
| Admin Dept : Revenue & Forest Department | प्रशासकीय विभाग : महसूल व वन विभाग |
| Demand No. : C-1 | मागणी क्रमांक : सी-१ |
| Major Head : 2515, Other Rural Development Programmes | प्रधान लेखाशीर्ष : २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम |
| Sub Major Head : 00 | उप प्रधान लेखाशीर्ष : ०० |
| Minor Head : 101, Panchayati Raj | गौण शीर्ष : १०१, पंचायत राज |
| Group Head : (01) | गट शीर्ष : (०१) |
| Sub Group Head : (01) (01)<br>Chief Minister Baliraja Shet / Panand Road Scheme (Scheme) (25152782) | उप गट शीर्ष : (०१) (०१)<br>मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना (कार्यक्रम) (२५१५२७८२) |

उपरोक्त नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यास महालेखाकार नागपूर कार्यालयाचे संदर्भ क्र. No.TM/Gr.III/UOR-२३/२०२५-२६/१९७९, दि. १३.०१.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेस अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

२. “मुख्यमंत्री बळीराजा शेत /पाणंद रस्ते योजना” या योजनेसाठी वजा वसुलीसाठी पुढीलप्रमाणे लेखाशीर्ष निर्माण करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| **लेखाशीर्ष (इंग्रजी)** | **लेखाशीर्ष (मराठी)** |
|---|---|
| Admin Dept : Revenue & Forest Department | प्रशासकीय विभाग : महसूल व वन विभाग |
| Demand No. : C-1 | मागणी क्रमांक : सी-१ |
| Major Head : 2515, Other Rural Development Programmes | प्रधान लेखाशीर्ष : २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम |
| Sub Major Head : 00 | उप प्रधान लेखाशीर्ष : ०० |
| Minor Head : 911, Recovery of Overpayments | गौण शीर्ष : ९११, अतिप्रदानांची वसुली |
| Group Head : (00) | गट शीर्ष : (००) |
| Sub Group Head : (00) (01)<br>Recovery of Overpayments (Scheme) (25152791) | उप गट शीर्ष : (००) (०१)<br>अतिप्रदानांची वसुली (कार्यक्रम) (२५१५२७९१) |

उपरोक्त वजा वसूलीकरीता नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यास महालेखाकार नागपूर कार्यालयाचे संदर्भ क्र. No.TM/Gr.III/UOR-२६/२०२५-२६/२१५४, दि. ११.०२.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेस अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३. तसेच मुख्यमंत्री बळीराजा शेत /पाणंद रस्ते योजनेंतर्गत कॉर्पोरेट कंपन्यांकडून सामाजिक दायित्व निधी (C.S.R. - Corporate Social Responsibility) अंतर्गत उपलब्ध होणारा निधी जमा करण्यासाठी विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव उप विभागीय अधिकारी यांच्या नावे बँक खाते उघडण्यास वित्त विभागाच्या व्यय-९ व कोषा प्रशा-५ (E Comp. No.:1491964 ) या कार्यासनाच्या अनुक्रमे अनौसं क्र.६८५/२०२५/व्यय-९, दिनांक २४.१२.२०२५ व अनौसं क्र.०४/२०२६/को.प्र.५, दिनांक ०८.०१.२०२६ रोजीच्या सहमतीस अनुसरुन मान्यता देण्यात येत आहे. सदर बँक खात्याबाबत वित्तीय शिस्तीचे काटेकोर पालन करण्यात यावे व सदर बँक खात्याचे नियमित लेखापरिक्षण करणे अनिवार्य राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२३१६०४०९२५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAPSINH
MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf278360d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB3773059876920F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.02.23 16:05:22 +05'30'

**( प्रतापसिंह म. खरात )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,

८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,

९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,

११.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

१२.सर्व विभागीय आयुक्त

१३.आयुक्त, नरेगा नागपूर

१४.आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे

१५.सर्व जिल्हाधिकारी.

१६.सर्व पोलीस अधिक्षक

१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१८. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)

२०.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.

२१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.

२२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२३.सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

२४.निवडनस्ती (पाणंद रस्ते)